SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Stat Cell : 0231-2609147.
website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४ – महाराष्ट्र
सांख्यिकी कक्ष : ०२३१-२६०९१४७.
E-Mail : statcell@unishivaji.ac.in
Estd : 1962
NAAC 'A++' Grade

जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/२०२३-२४/एआयएसएचई/कार्यशाळा /61 दिनांक : 10/01/2025

# परिपत्रक

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था,**

**विषय : अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) प्रशिक्षण कार्यशाळेस उपस्थित राहण्याबाबत...**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, शिवाजी विद्यापीठातील सर्व संलग्नित महाविद्यालये / संस्था मधील नोडल अधिकाऱ्यांकरिता अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम प्रशिक्षण कार्यशाळा **सांख्यिकी कक्ष व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २१/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता राजर्षी शाहू सभागृह, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** येथे आयोजित केलेली आहे. सदर कार्यशाळेसाठी आपले महाविद्यालय / संस्था मधील एआयएसएचई चे काम पाहणाऱ्या नोडल अधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे. सदर कार्यशाळेमध्ये एआयएसएचई चे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

सदर कार्यशाळेस उपस्थित राहणाऱ्या नोडल अधिकाऱ्यांची कार्यरत रजा संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी / संचालकानी मंजूर करावी. उपस्थित असलेल्या नोडल अधिकाऱ्यांचा दैंनिक व प्रवास भत्ता विद्यापीठ अथवा शासनाकडुन प्रतिपुर्ती होणार नाही याची नोंद घ्यावी. **सदर कार्यशाळेसाठी ज्या महाविद्यालयाच्या एआयएसएचई नोडल अधिकारी यांना प्रशिक्षणाची गरज आहे त्यांनी सदर कार्यशाळेसाठी उपस्थित रहावे तसेच आपली उपस्थिती दर्शवण्याकिरता परिपत्रकासोबत पाठविलेल्या लिंक (Google Form) वर नोंदणी करावी** जेणे करून आपले प्रमाणपत्र तयार करण्यास सोईचे होईल व कार्यशाळेचे योग्य नियोजन करता येईल. **सर्व महाविद्यालये / संस्थाकरिता एकत्र कार्यशाळा घेणार असल्याने नोंदणी असलेल्या नोडल अधिकारी यांचा विचार केला जाईल याची कृपया नोंद घ्यावी. सदर नोंदणीची लिंक दि.१८/०१/२०२५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता बंद करण्यात येईल.**

**Link For Registration:-** https://forms.gle/xeqCZUt6BtBzNixy9

कळावे.

आपला विश्वासु,

**कुलसचिव**